अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
साय.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १६४ ■ रविवार दि.२ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 164 ■ Sunday Dt. 2 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## वडवणी नगरपंचायत इमारतीचे रूपडे पालटणार

**वडवणी । प्रतिनिधी**

नगरपंचायतच्या इमारत बांधकामासाठी आ. प्रकाश सोळंके यांचे प्रयत्नातून ५ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ दि.१ मार्च शनिवार रोजी उपस्थित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आला. वडवणी नगरपंचायतची स्थापना २०१५ साली झाली परंतु नगरपंचायतचा कारभार आजही जुन्या ग्रामपंचायतच्या इमारतीतूनच चालत आहे. या जुन्या इमारतीमध्ये नगरपंचायतचे कामकाज करण्यास अडचण येत असून सर्व विभागांचे कामकाज करण्यासाठी या इमारतीसह बचतगट भवनातून कारभार बघण्यात येत आहे. ही अडचण लक्षात घेऊन आ. सोळंके यांनी नगरपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस व आघाडीच्या ताब्यात आल्यानंतर वडवणी शहरासाठी भरघोस निधी मंजूर करून घेतला.

## घरासमोर उभ्या कारची पाचही चाके पळवली

**हदगाव । प्रतिनिधी**

हदगाव शहरातील कमलाईनगरमधील निवृत्त शिक्षक मारुती दांगट यांच्या घरात किरायाने राहणारे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सचिन सूर्यवंशी यांची महागडी कार घरासमोर पार्क केलेली होती. गाडीची चारही चाके तसेच स्टेपनी चोरट्यांनी गुरुवारी मध्यरात्रीत लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शहरातील तामसा टी पॉईंट परिसरात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सचिन सूर्यवंशी यांचे सिद्धीविनायक हॉस्पिटल आहे. ते गुरुवारी आपल्या हॉस्पिटल मधील कामकाजा आटोपून रात्री कमलाई नगरमध्येआपले काका देविदास शामराव सूर्यवंशी यांच्या घरी गेले. घराच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत त्यांनी त्यांची कार (एमएच २६ सीई ६३०) उभी करून काकाच्याच घरी जेवण वगैरे करून तिथेच मुक्काम केला.

# आ. धसांच्या वाढदिवसाच्या जाहिराती देणाऱ्या अजिंक्य ट्रेडर्सने केला भ्रष्टाचार ?

## अजिंक्य ट्रेडर्स कोणाचे हे मुख्याधिकारी नीता अंधारे आणि गणेश पगारे यांनी सांगावे
## पगारे पिता–पुत्र लुटू लागले बीड न.प.च्या तिजोरीतून लाखोंचा माल; नीता अंधारे यांची साथ?

- अनेक दैनिकात आ. सुरेश धसांच्या वाढदिवसाच्या जाहीराती, लाखोंचा खर्च
- अजिंक्य टेंडर्सकडून आ. सुरेश धसाना वाढदिवसाच्या शुभेच्छा.?
- अजिंक्य ट्रेडर्सची चौकशी करा आ.सुरेश धसाच्या वाढदिवसाला लाखोंच्या जाहिरात बीड नगरपरिषदेतील भ्रष्टाचाराचा पैसा खर्च केल्याची बीड शहरात नागरिकात चर्चा रंगू लागल्या?
- अजिंक्य ट्रेडर्स नेमकं कोणाचं मालकाचे नाव नीता अंधारे गणेश पगारे यांनी सांगावं?
- आ. सुरेश धसानी दिलं होतं चांगला अधिकारी बीडला द्या म्हणून गणेश पगारे च्या नावाने शिफारस पत्र त्याने केला बीड नगर परिषदेत दोनशे कोटीचा घोटाळा.?
- आ. सुरेश धसाच्या नावाने वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिरात देणाऱ्या अजिंक्य ट्रेडर्सने केला बीड नगर परिषदेमध्ये भ्रष्टाचार अजिंक्य टेंडर्स कोणाचे आहे हे मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगार यांनी सांगावं?
- बीड शहरातील नागरिकांना आ. सुरेश धस यांच्या शिफारशीमुळे होऊ लागला नाहक त्रास.?
- बीड नगर परिषदेतील २०० कोटीच्या घोटाळ्यात मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारेचा हात तर आ. सुरेश धसाच्या वाढदिवसाला अजिंक्य ट्रेडर्स ने दिल्या लाखोंच्या जाहिराती?



बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारे अजिंक्य ट्रेडर्सच्या माध्यमातून वाहनाच्या नावावर बोगस बिलं उचलणाऱ्या अजिंक्य ट्रेडर्स त्यांचा मालकाघ नाव मुख्याधिकारी निता अंधारे बबीड नगर परिषदेतील २०० कोटीच्या घोटाळ्यात नीता अंधारे गणेश पगारे यांचा हात तर आ. सुरेश धसाच्या वाढदिवसाला अजिंक्य ट्रेडर्स ने दिल्या लाखोंच्या जाहिराती. सांगतील का ?



गणेश पगारेच्या मुलाच्या नावाने असलेला अजिंक्य टेंडर्स किंवा – टेंडरच्या नावावरती लावलेल्या ट्रॅक्टर सह अन्य वाहनांची एकूण वाहतुकीची बीड नगर परिषदेच्या लेखा विभागातून काढली जाते लाखो व बिलांची रक्कम गणेश पगारे यांच्या अंधारातून पार्टनरशिप मध्ये आहात एकूण सर्व वाहनांची व टेंडर मधील कंत्राटदार गुत्तेदारांची चौकशी होणे गरजेचे?




**आष्टी पाटोदाची यंत्रणा बीड नगरपरिषद मध्ये पाठवून आ. सुरेश धस यांनी बीड नगरपरिषद काबीज करण्याचा केविलवाणी प्रयत्न?**

बीड नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे आल्यापासून २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार त्यांनी सहजरीत्या केलेला आहे. यामध्ये बीड शहरातील विकासासाठी योजना राबविलेले फक्त कागदावर दिसत आहेत. परंतु बीड नगरपरिषद ही अकाउंटंट च्या नावावर लूटून खाणारा बीड नगर परिषदेचा भ्रष्टाचाराने बरबटलेला गणेश पगारे हा व त्याचा मुलगा अजिंक्य गणेश पगारे हे बाप लेक आता बीड नगर परिषद चुरून खाऊ लागले आहे. बापाच्या नंतर लेकांनी गुत्तेदारी मध्ये पाय ठेवून आता भ्रष्टाचार करण्यास सुरुवात केली आहे. त्यांना साथ देत आहेत.

त्या बीडच्या नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी निता अंधारे तर अकाउंटंट गणेश पगारे चा मुलगा अजिंक्य पगारे हा बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छता कर्मचारी आहे का नेमका बीड नगर परिषदेमध्ये गुत्तेदार आहे.? हे मात्र बीड शहरातील जनतेला अजून समजू शकले नाही जर हा स्वच्छता कर्मचारी आहे हा तर कुठे स्वच्छता विभागातील काम करताना कुठे दिसला नाही कामावर न येताच माझा बाप मोठा माणूस आहे माझा बाप बीड नगर परिषद घेऊन खिशात घेऊन फिरतो असं समजणाऱ्या गणेश पगारेच्या अजिंक्य नावाच्या युवराज मात्र आता गुत्तेदारीचे वेध लागले आहे आणि एक ट्रॅक्टर आहे जे गणेश पगारे यांच्या मुलाच्या नावे असलेल्या अजिंक्य पगारे म्हणजेच अजिंक्य ट्रेडर्स ने एम एच. २३ ए एस. ८४०१ या ट्रॅक्टर बीड नगरपरिषद वरती लावल्याचे दाखविले व या ट्रॅक्टर वरती लाखोचे बिल उचललेले आहेत विशेष म्हणजे लेखापाल असलेल्या गणेश पगारे अगोदर स्वतःच्या अजिंक्य ट्रेडर्सचे बिल काढतो अशीही तक्रार यावेळी अनेक बीड नगर परिषद मधील गुत्तेदारांची आहे स्वतःची गुत्तेदारी अगोदर आणि नंतर दुसऱ्यांची आणि त्यामध्ये सुद्धा दहा पंधरा टक्के व टक्केवारी आपल्याशिवाय बिलं काढत नाही बीड शहरातील स्वच्छता विभाग अंतर्गत कचरा संकलनासाठी व गाळ वाहतुकीसाठी करायला लावलेल्या ट्रॅक्टरचे व वेगवेगळ्या कामासाठी लावलेले ट्रॅक्टर हे काम न करताच त्यांना बीड नगर परिषद मधून निधी व त्यांची गुत्तेदारी स्वतः कागदावर लिहून भ्रष्टाचार करत असलेल्या गणेश पगारेला नीता अंधारे साथ देत आहेत तर यामध्ये नीता अंधारे सुद्धा अंधारातून पार्टनर असल्याची चर्चाही बीड नगर परिषदेतील कर्मचारी व दीड शहरातील नागरिकांमध्ये चर्चा रंगू लागल्या आहेत.

बीड नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे च्या कार्य काळामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे यामध्ये बीड परिषदेमध्ये वेगवेगळ्या ४६ प्रभागांमध्ये विकास कामे फक्त कागदावर दाखवून २०० कोटी रुपयांचा निधी मुख्याधिकारी नितांत अंधारे अकाउंटंट गणेश पगारे व गुत्तेदार यांनी हडप केले चा धक्कादायक प्रकार बीड नगर परिषद मध्ये समोर येत आहे. याचे अनेक पुरावे ही तक्रार यांच्याकडे आहेत. अनेकांनी विविध बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे. अकाउंटंट गणेश पगारे ताब्यातील बीड नगर परिषदे विविध विभाग बांधकाम स्वच्छता पाणीपुरवठा विद्युत सह बीड नगर परिषदेतील अनेक विभागातील भ्रष्टाचार संदर्भात तक्रार दिलेल्या आहेत. परंतु मुख्याधिकारी नीता अंधारे व गणेश पगारे हे प्रशासकाच्या अडून बीड नगरपरिषद लूटण्याचे काम करत आहेत. तर बीड नगर परिषदेचे अकाउंटंट भ्रष्टाचाराने बरबटलेला गणेश पगारे चा मुलगा स्वच्छता कर्मचारी असलेला अजिंक्य पगारे हा नेमका बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छता कर्मचारी आहे का गुत्तेदार आहे अजिंक्य ट्रेनर्स च्या नावाखाली गणेश पगारे व त्याच्या मुलाने स्वतःची खाजगी वाहने या ठिकाणी बीड नगर परिषदेतील कामकाजाच्या वाहतुकीसाठी लावलेले आहेत आणि गणेश पगारे चा मुलगा अजिंक्य पगारे हा बीड नगर परिषद मध्ये नेमका स्वच्छता कर्मचारी आहेत का गुत्तेदार आहे असा प्रश्न आता बीड शहरातील नागरिकांना पडलेला आहे तर आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार सुरेश धस आपल्या पाठीशी आहे. घाबरायचं नाही म्हणून गणेश पगारे यांनी व अजिंक्य पगारे यांनी अजिंक्य ट्रेडर्स च्या नावाने जाहिराती अनेक दैनिकांमध्ये देऊन सुरेश धस याचा वाढदिवस मोठ्या थाटात संपन्न केला याला सर्वांना पाठीशी घालण्यासाठी जाहिराती अण्णांचे वाढदिवसाला सर्व दैनिकांना द्या असा एक फोन बीड नगर परिषदेच्या नीता अंधारे यांनी कडून गणेश पगारेला आदेश दिल्याची ही चर्चा बीड नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी कर्मचारी बीड शहरातील नागरिकांमध्ये जोर धरू लागले आहेत त्यामुळे गणेश पगारे चा मुलगा अजिंक्य पगारे हा बीड नगर परिषदेत गुत्तेदार आहे का स्वच्छता कर्मचारी आहे व अजिंक्य ट्रेडर्स हे नेमकं कोणाच्या नावावरती आहे याचं उत्तर मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारेची दिले पाहिजे. अजिंक्य टेंडरची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

# धारूर तालुक्यात अफूची शेती पोलिसांची कार्यवाही

**धारूर / प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पिंपरवाडा चोंडी तसेच जहागीर मोहा या तीन गावाच्या केंद्रस्थानी असलेल्या पिंपरवाडा शिवारात एका शेतकऱ्याने तीन गुंठे जमिनीवर चक्क अफूची शेती पिकवली आहे.या ठिकाणची माहिती एलसीबी ला प्राप्त झाल्यानंतर तीन अधिकाऱ्यांसह १२ पोलीस कर्मचारी दुपारी बारा वाजल्यापासून या ठिकाणची कार्यवाही करत आहेत.

धारूर तालुक्यातील पिंपरवाडा गावच्या शिवारात पिंपरवाडा चोंडी तसेच जहागीर मोहा या तीन गावांच्या केंद्रस्थानी असलेल्या ठिकाणी रामहरी तिडके नावाच्या शेतकऱ्याने चक्क अफूची शेती पिकवली आहे. याबाबत बीड एलसीबी कडे माहिती प्राप्त झाल्यानंतर पथकाने तीन अधिकाऱ्यांसह १२ पोलीस कर्मचारी घेऊन दुपारी बारा वाजल्यापासून या ठिकाणी कार्यवाही सुरू केलेली आहे. सायंकाळी सहा वाजता त्या तीन गुंठे शेतीतील अफू उपटून घेण्यास सुरुवात केली आहे. अफू उपटून घेतल्यानंतर त्याचं जे वजन एकत्रित होणार आहे त्यानुसार किती लाखाचा मुद्देमाल पकडला याबाबत पोलिसांकडून सविस्तर माहिती दिली जाईल असं सांगण्यात येत आहे. तत्पूर्वी धारूर तालुक्यात अफूची शेती आढळून आल्याने एकच खळबळ

पान २ वर



# वाळूची कारवाई करत असतांना एका पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण

**गेवराई । प्रतिनिधी**

सुरळेगाव व राक्षभूवन परिसरात खाजगी वाहन घेऊन कार्यवाई करत असतानां चकलांबा पोलिस ठाण्याच्या एका कर्मचारी याला सहा वाळू माफियांनी हानमार केली असल्याची गंभीर घटना समोर आली आहे याबाबद चकलांबा पोलिसांत शनिवारी रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चकलांबा पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, चकलांबा पोलिस ठाणेदार संदिप पाटील यांनी फोन करून राक्षसभूवन व सुरळेगाव परिसरात वाळू चोरी जात आहे त्याठिकाणी जाऊन कार्यवाई करावी असे आदेश दिल्यानंतर हनुमंत इंगोले हे खाजगी वाहनाने आपल्या सोबत इतर करमचारी यांना




पान २ वर

# वडवणी तहसिलदारांचा खोटारडेपणाने बोलतात? माहिती देण्यास काटकसरपणा दाखविला

## वडवणीत दोन टिपर पकडले; चौकशी करुन सोडलेल्या टिपरची माहिती मात्र देता येईना




वडवणी । प्रतिनिधी
वडवणी येथे काल दि.२७ रोजी एक खडीचे व एक मुरमाचे टिपर वाहतुक करत आसताना पकडले. तर खडी भरलेल्या टिपरची चौकशी करुन रॉयल्टी भरलेली पावती होती यामुळे सोडून दिले तर दुसरे मुरुम भरलेले टिपर तहसिलच्या प्रंगणात उभा केले आहे. तर याबाबत माहिती घेण्यासाठी वडवणीचे तहसिलदार वैभव महेंद्रकर यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला आसता त्यांनी माहिती देण्यासाठी कटकसर केली आहे. टिपर कुठे पकडले ? सोडून दिलेले खडीच्या टिपरचा नंबर काय ? असे विचारल्यावर तहसिलदार यांना सांगता आले नाही. तर समोर भेट घेतल्या नंतर माहिती देणार नाही असा पवित्र घेत गौण खनिज अधिकारी यांना विचारा असा सल्ला दिला आहे.
काल वडवणी याठिकाणी खडीचे एक व मुरुम वाहतुक करणारे एक असे दोन टिपर पकडले आहेत. सदरील टिपर तहसिल प्रशासनाच्या ताब्यात होते. अशी माहिती मिळाली होती. यानंतर पत्रकार प्रतिनिधी यांनी माहिती घेण्यासाठी तहसिल कार्यालयात गेले. तहसिलदार यांची कॉंबिन बंद दिसली तेव्हा नायब तहसिलदार जरांगे यांच्याशी भेट घेतली तेव्हा याविषयीची माहिती तहसिलदार साहेब यांच्याशी बोला असे सांगितले. तेव्हा तहसिलदार यांच्या कार्यलयाचे दार पुन्हा बंद दिसले. म्हणून भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला तर ते म्हणाले कि, खडी भरलेले आणि मुरुमाची वाहतुक करणारे टिपर पकडले होते. यातील खडी भरलेले टिपरची रॉयल्टी भरली होती म्हणून सदरील टिपर सोडून दिले आहे. यानंतर टिपर कोणी पकडले आणि कुठे पकडले ? अशी विचारणा केल्यानंतर कुठे पकडले हे सांगता आले नाही, सोडलेल्या टिपरचा नंबर सांगत आला नाही. तसेच खडीने भरलेला टिपर हा पीडब्लूडी ने दिला आहे. अशी खोटी माहिती दिली तर मुरुमाने भरलेला टिपर हा एसडिओ साहेबांनी पकडला आहे. अशी माहिती दिली आहे. तर पकडलेला खडीचा टिपर पीडब्लूडीला अधिकार आहे का ? यावरुन कसा कारभार सुरु आहे. दिसून येते.

### तुम्हाला माहिती देणार नाही

वडवणी तहसिलदार यांची कॉंबिनचे दार उघडे दिसले म्हणून समक्ष भेट घेतली तेव्हा फोनवर तुम्हीच होते का? असा सवाल तहसिलदार यांनी करताच मी फोनवरुन माहिती दिली आहे. आता माहिती देणार नाही असा पवित्रा घेतला यानंतर पत्रकार यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा हि माहिती गौणखनिज अधिकारी यांच्याकडून घ्या, असे सांगितले तर याठिकाणचे गौणखनिज विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क केला आसता म्हणाले कि, मी माजलगांव एसडिओ कार्यालयात दोन दिवसांपासून इंकडेच आहे. टिपर पकलेली माहीती माझ्याकडे आहे. या विषयी काहीच माहिती नाही. असे सांगितले तेव्हा वडवणीचे तहसिलदार यांचा किती कर्तव्यपणा आणि माहिती वजा आहेत. यावरुन दिसून येते.



बुंदलपुरा चषक क्रिकेट स्पर्धा निमित्त प्रथम बक्षीस सलीम अध्यक्ष युवा मंचर्फे द्वितीय बक्षीस मुन्ना भाई अलमास यांच्यातर्फे देण्यात आला हे क्रिकेट स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बुंदलपुऱ्यातील मित्र परिवारांनी मेहनत घेतली.

## महाराष्ट्र पोलीस बॉय संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी शुभम वाघमारे

बीड । प्रतिनिधी
बीड शहरातील नागरिकांच्या व सामाजिक चवळीमध्ये शुभम वाघमारे यांचा मोलाचे योगदान व कार्य असल्याने आज त्यांची महाराष्ट्र पोलीस व संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली शुभम भैया वाघमारे यांची महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटना बीड जिल्हा अध्यक्षपदी (लीगल सेल) निवड महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना बीड जिल्हा अध्यक्षपदी (लीगल सेल) ड.शुभम गौतमराव वाघमारे यांची निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले व पदाधिकारी योगेश कदम, दत्ता गवते, आदर्श जाधव, प्रशांत जगताप यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या कुटुंबात सहर्ष स्वागत केले. महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैया दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. शुभम भैय्या वाघमारे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे स्वागत करण्यात येत आहे व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.




## सेंट झेवियर्स हायस्कूल येथे मराठी दिन सोहळा उत्साहात साजरा

मुंबई । प्रतिनिधी
भाषा नेहमीच विशिष्ट प्रदेशाची संस्कृती आणि वारसा समृद्ध करते तसेच हे वारसा दाखवते आणि प्रदेशाचे गौरव करते.आपली मायबोली मराठी ही अधिकृत राज्यभाषा तसेच महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा आहे.सुंदर मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी१मार्च२०२५रोजी सेंट झेवियर्स हायस्कूल बोरीवली पूर्व येथे मराठी दिन साजरा करण्यात आला.मराठी भाषा दिन साजरा करणे हे मराठी भाषेचे सार दर्शविते आणि मराठी भाषिक समुदाय, साहित्य, कला, संगीत आणि समाजातील योगदान ओळखण्याची संधी देते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी आणि लेखक,विष्णू वामन शिरवाडकर ज्यांना'कुसुमाग्रज'म्हणून ओळखले जाते, यांच्या जीवन आणि कार्याला आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.प्रवेशद्वारावर लेझीम सादरीकरणाद्वारे पाहुण्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.
श्री.चंदन सुभाष विचारे-कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, सांस्कृतिक प्रवासी आणि वारसाप्रेमी यंदाच्या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमाची सुरूवात प्रभुची प्रार्थना,बायबल वाचन, विशेष प्रार्थना, स्वागत भाषण, स्वागत गीत आणि मराठी भाषेचे महत्त्व या विषयावरील भाषणाने झाली.प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या कोळी नृत्य आणि लावणी सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाची धुरा वाहिली. मराठी दिनानिमित्त आठवडाभरात घेण्यात आलेल्या उपक्रम आणि स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आभारप्रदर्शन व सुमधुर समारोप समारंभाने झाली. पाहुण्यांनी महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम मांडल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्ष डॉ.ए.एफ.पिंटो आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ.ग्रेस पिंटो यांनी मूल्ये रुजविण्याचा आणि विद्यार्थ्यांमध्ये त्यांची प्रादेशिक संस्कृती,भाषा आणि वारसा परंपरागत रुजवून ठेवण्यासाठी आणि मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा वारसा मोठ्या प्रमाणावर जोपासना व गौरव करण्याच्या प्रयत्नांचे अतिथींनी कौतुक केले.

# मुख्य आरोपींना मदत करणाऱ्यांनावर मोक्का लावा

## कराडला कोणी लपवून ठेवलं, कोणी पैसे पुरवले याची चौकशी करा

बीड । प्रतिनिधी
संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहआरोपपत्र दाखल करून या प्रकरणामधील आरोपींना ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सर्वांची चौकशी करून त्यांच्याविरुद स्वतंत्र मोका लावावा अशी मागणी आ.सुरेश धस यांनी केली आहे. सगळ्यांनाच आरोपी करावे असे आम्ही माणत नाहीत. कारण सह आरोपी वाढवण्याच्या नादामध्ये मुख्य केसला पका लागेल असे काही कृत्य आमच्याकडून होणार नाही. परंतु याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. धनंजय देशमुख, त्यांचे कुटुंबिय मस्साजोगकर आणि बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील तमान जनतेचे हेथ मत असुन या संदर्भात मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फड़णवीस यांना भेटणार असल्याचे आ.धस यांनी सांगितले.
मम्माजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. केस दाखल झाल्याच्या नंतर आरोपीला एसआयटीच्या ऑसिसपर्यंत नेऊ घालेपर्यंत लपवून ठेवतात. त्याला कोणी कोणी लपवून ठेवले ? कोणी कोणी पैसे दिले? कोणी कोणी याला काय काय पुरवलं? आणि आता जेलमध्ये सुध्दा पुरवतात. या सर्वांची स्वतंत्र चौकशी करून त्यांच्याविरुध्द मोकांतर्गत स्वतंत्र गुन्हा दाखल व्हावा अशी आमची मागणी असून या संदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले.

**आरोपी वाढण्याची शक्यता**

संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या तक्रारीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकता दाखवली आहे. या तक्रारींची छाननी केल्यानंतर कदाचित यात आणखी काही आरोपी वाढण्याची शक्यता असल्याचं सुरेश धस म्हणालेत. खंडणी ट्रॉसिटी आणि हत्या या दोन्ही तिन्हीं घटना एकत्र आहेत त्यामुळे नियम (३४) अन्वये या सगळ्या घटनांची सामुदायिक नोंद करण्यात आली आहे म्हणजे यातील सर्व लोक हे सारखेच जबाबदार आहेत. कोणी मारायला आहे कोणी फोनवर आहे कुणी आदेश सोडणारे आहेत प्रमुख सूत्रधार तर वाल्मिकच आहे. बाकीचे सगळे प्यादे म्हणून वापरले गेलेत असेही धस म्हणाले. एसआयटीने केलेला तपास अगदी योग्य आहे यातील अधिकाऱ्यांनी अतिशय शिताफीने ८० दिवसात आरोपपत्र दाखल केलं आहे कारण मकोका अंतर्गत आत गेलेले आरोपी ९० दिवसांनंतर जामिनासाठी अर्ज करू शकतात त्यामुळे ८० दिवसातब आरोप पत्र दाखल केलं असल्याचंही पस म्हणाले आता या आरोपींचा फास आवळणार आहे.

# न्यायालयीन वकील कर्मचारी भीम जयंती अध्यक्षपदी ॲड.विनायक जाधव

बीड । प्रतिनिधी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती महोत्सव मोठ्या हर्ष उत्सवात साजरी करण्यासाठी बीड येथील सर्व वकील बंधू-भगिनी आणि कर्मचारी यांची बैठक दिनांक एक मार्च २०२५ रोजी ज्येष्ठविधीज्ञ ऍड.बाळासाहेब बाहेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली होऊन २०२५ भीम जयंती उत्सव समिती कार्यकारणी जाहीर करण्यात आली या कार्यकारणी मध्ये सर्वानुमते पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आली,



अध्यक्ष ऍड.विनायक जाधव, उपाध्यक्ष ऍड.राईस पठाण, सचिव ऍड.प्रवीण सेम सरचिटणीस, ऍड. यासेर पटेल, कार्याध्यक्ष ऍड.सुभाष पिसोरे सहसचिव ऍड.श्रीकांत जाधव, कोषाध्यक्ष ऍड.गोरक्ष खेडकर महिला प्रतिनिधी ऍड.रेखा वडमारे, याप्रमाणे कार्यकारी निवडण्यात आली तसेच उत्कृष्ट भीम जयंती साजरी करण्यासाठी वेगवेगळे उस्तव समिती स्थापन करण्यात आली,
मोटार सायकल बंधुभाव रॅली प्रमुख ऍड.राहुल साळवे, व्याख्यान समिती व सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख ऍड.रोहिदास येवले, प्रसिद्धीप्रमुख ऍड.विलास जोशी, तर मार्गदर्शक म्हणून ऍड.वसंत वडमारे, ऍड. के.एस. पंडित, ऍड.भीमराव चव्हाण, ऍड.शिवाजी साळवे, ऍड.नितीन वाघमारे, ऍड.अविनाश गडगे, ऍड.राजन साळवी, ऍड.सतीश सोनवणे, ऍड.फिडेल चव्हाण, ऍड.शिवाजी कांबळे, ऍड.राजू शिंदे, ऍड.शिवाजी झिंजुर्डे, ऍड.काकासाहेब सोनवणे, ऍड.अशोक वाघमारे, यांची नियुक्ती करण्यात आली बैठकीत शेवटी आभार प्रदर्शन ऍड.पंकज रायबोळे यांनी केले.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश सरचिटणीसपदी ॲड. सुभाष राऊत यांची निवड

बीड । प्रतिनिधी
अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची राज्य कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. भुजबळ फार्म नाशिक येथील कार्यालयात माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.
यावेळी राज्यासह देशात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची ताकद अधिक वाढवण्यासाठी समता परिषदेच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जोमाने काम करावे. राज्यातील सर्व ओबीसींचे संघटन करून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्राधान्य द्यावे असे आवाहन माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांनी यावेळी केले.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या कार्यकारणीमध्ये प्रदेश कार्याध्यक्षपदी बापूसाहेब भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश कार्यकारणी मध्ये एकूण ३२ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. कार्यकारिणीमध्ये प्रदेश सरचिटणीसपदी मुस्लिम ओबीसी समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, तेली समाजाचे नेते ईश्वर बाळबुधे, दिलीप खैरे,ड.सुभाष राऊत,वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश उपाध्यक्षपदी भटक्या विमुक्त समाजाचे नेते जी.जी.चव्हाण, माजी आमदार पांडुरंग अभंग, शंकरराव लिंगे, डॉ. कैलास कमोद, मराठा समाजाचे नेते शिवाजीराव नलावडे, सौ.पार्वतीताई शिरसाठ, अंबादास गारुडकर, कुणबी समाजाचे नेते प्रा.दिवाकर गमे, दलित समाजाचे नेते बाळासाहेब कर्डक, ॲड. राजेंद्र महाडोळे , लोणारी समाजाचे नेते डॉ. सुदर्शन घेराडे, प्रदेश चिटणीसपदी डॉ. गणेश खारकर, किशोर कन्हेरे, डॉ. डी. एन. महाजन, विणकर समाजाचे नेते सुनील मेटे, समाधान जेजुरकर, नाभिक समाजाचे नेते अनिल निकम, धनगर समाजाच्या नेत्या डॉ.स्नेहा सोनकाटे, ओबीसी समाजाचे नेते कैलास मुदलीयार, प्रदेश संघटकपदी प्रा.रवींद्र खरात तर प्रदेश प्रचारकपदी डॉ. नागेश गवळी, प्रा. संतोष विरकर, ढोर समाजाचे नेते मुकुंद सोनटक्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### ॲड. सुभाष राऊत यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत

समता सैनिक ते अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस या पदापर्यंत पोहोचणारा ड. सुभाष राऊत हा एकमेव एकनिष्ठ कार्यकर्ता असून त्यांना न्याय मिळाल्याबद्दल भाऊ त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. आजतागायत ड. सुभाष राऊत यांनी समता सैनिक, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष, बीड नगरपालिकेचे नगरसेवक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य, समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष. राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) अशी विविध पदे भूषविली असून अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये छगनराव भुजबळ साहेब यांचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून ख्याती मिळवलेली आहे. समता परिषदेच्या प्रदेश सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल त्यांनी समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय छगनराव भुजबळ साहेब, नूतन कार्याध्यक्ष पंकजभाऊ भुजबळ, समीरभाऊ भुजबळ यांचे आभार व्यक्त केले असून ड. सुभाष राऊत यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

पान १ वरून...

### वाळूची कारवाई करत असतांना एका पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण

घेऊन गेले तसेच सुरळेगाव परिसरात एक लोडर व एक वाळूने भरलेले ट्रॅक्टर होते तसेच सदरचे दोन्ही वाहन ताब्यात घेत असतांना त्याठिकाणी असनाऱ्या वाळू माफियानी सदर कर्मचारी यांच्या सोबत हुज्जत घातली व त्याला जबर मारहाण केली आहे यामध्ये त्यांच्या हाताला गंभीर ईजा झाली असून त्यांच्यावर बीडच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत तसेच हे सहा लोक जालना जिल्ह्यातील आहेत व ज्याठिकाणी ही घटना घडली त्यावेळी दोन हायवा देखील चकलांबा पोलिसांनी ताब्यात घेतल्या होत्या हायवा वर वेगळा गून्हा आणि यावर वेगळा गून्हा दाखल करण्यात आला आहे तसेच एक घटनेचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केल्या असल्यामुळे चकलांबा पोलिसांच्या कार्यप्रनालीवर संशय व्यक्त केला जात असून या घटनेचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अजय पानपाटील करत आहेत.

### धारूर तालुक्यात अफूची शेती पोलिसांची कार्यवाही

उडाली आहे. तसेच या अफूच्या माध्यमातून नशेखोरांना नशा करण्यास अफूचा उपयोग होतो आणि त्यासाठीच नशेखर अफूचा उपयोग करून घेतात. रामहरी तिडके यांनी शेततळे खोदून त्याच्याद्वारे अफूला पाणीपुरवठा करत अतिशय दुर्गम भागात जिथे सहज जाणं शक्य नाही अशा ठिकाणी अफूची शेती पिकवली आहे. अफू पिकवणे कायद्याने निर्बंध घातलेले असताना रामहरी कारभारी तिडके या शेतकऱ्याने अफूची शेती पिकवल्यामुळे पिंपरवाडा गाव चर्चेत आला आहे.

पान ४ वरून...

### पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांची दादागिरी

क्रमांक ३ बीड केली होती. यामुळे सुबुद्धीने मी घटनास्थळी हजर नसतानाही माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरवर्षी पाटबंधारे विभागातील कर्मचाऱ्यांच्या गलधान कारभारामुळे शेतीपिकांचे नुकसान होत आहे.मात्र पाटबंधारे विभागाचे अधिकारी लेखी तक्रारीकडे जणिवपुर्वक दुर्लक्ष करतात.

पाटबंधारे विभागाचे कर्मचारी नशेत असतात, शेत पिकांच्या नुकसानीबाबत जाब विचारला तर गुन्हा दाखल केला :- आशाबाई येडे

माझे मालक पोट भरण्यासाठी गुजरात मध्ये गेलेले आहेत. मी माझ्या लेकराबाळा सोबत एकटीच शेती करते.दरवर्षी कालवा फुटुन आमच्या शेतीचे नुकसान होते. पाणी सोडणारे कर्मचारी नशेत असतेत. त्यांना वारंवार सांगुन ऐकत नाहीत. त्यादिवशी दारुच्या नशेत चिखलात पाण्यात पडले.आम्हाला दमदाटी केली आणि आमच्यावरच गुन्हे दाखल केलेत, अशी कैफियत आशाबाई गणेश येडे यांनी माड़ली.

पाटबंधारे विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे पाण्याचा अपव्यय,शेतीपिकांचे नुकसान ; आंदोलन उभारणार :- बाळासाहेब मोरे पाटील ( शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष )

गेल्या २०-२५ वर्षांपासून पाटबंधारे विभागाचा गलधान कारभार सुरू असुन कालव्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. कालवा फुटल्याने ७५ टक्के पाणी गणेश नदी आणि शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पिकांचे नुकसान होते.मी सटवाई देवी पाणी वापर संस्थेचा चेअरमन असुन सुद्धा गेल्या २५ वर्षात मला अथवा गावातील शेतकऱ्यांशी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी संवाद साधलेला नाही.शेतक-यांना विश्वासात घेतले जात नाही. पाटबंधारे विभागाच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांना भेटून निवेदन सादर करणार आहोत.पिडीत शेतकऱ्यांना न्याय नाही मिळाला तर रस्त्यावरची लढाई लढण्याचा ईशारा बाळासाहेब मोरे पाटील यांनी दिला आहे.

पाटबंधारे विभागाला शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे सोयरसुतक नाही :- कैलास येडे ( सरपंच अंजनवती)

पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे नुकसान झाल्याचे सोयरसुतक नाही. कैलास येडे यांच्या सिमला मिरचीचे नुकसान झाल्यानंतर पाटबंधारे विभागाच्या वरीष्ठ आधिका-यांना फोनवरून कल्पना देऊन ३ तास वाट पाहिली परंतु आलेच नाहीत. तलावाची थातुरमातुर दुरुस्ती करून बिले उचलली जातात. पाणी सोडणारे कर्मचारी २४ तास नशेत असतात आणि पैसे घेऊन काम करत असुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सरपंच कैलास येडे यांनी केली आहे.

अशाच प्रकारे शेत पिकांच्या नुकसान झाल्याचे श्रीराम वारकरी, भास्कर येडे, स्वामी येडे, गणेश येडे, सत्यभामा येडे यांनी सांगितले.

# वासुदेवायन पुस्तकाचा प्रेरणादायी प्रवास: चरित्र, तत्त्वज्ञान आणि मानवनिर्मितीचा महोत्सव

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन आणि पुस्तक परिचर्चा कार्यक्रम उत्साहात




बीड । प्रतिनिधी
दिनांक १ मार्च २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयात आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पुस्तक परिचर्चा कार्यक्रमात वासुदेवायन या प्रेरणादायी ग्रंथावर सखोल चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात श्री बंकटस्वामी महाराज व वि.वा.शिरवाडकर कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व वासुदेवायन पुस्तकाचे लेखक डॉ.विवेक मिरगणे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.छाया महाजन उपस्थित होत्या.वासुदेवायन पुस्तकातील तत्त्वज्ञान, शब्द, विचार, अध्यात्म व विज्ञान यांची सांगड यासंबंधी चर्चा करताना डॉ.छाया महाजन यांनी या ग्रंथातील लेखनशैली अत्यंत उत्कृष्ट असल्याचे नमूद केले. गुरुजींनी केलेले मानवनिर्मितीचे प्रयोग आणि त्यांचे योगदान यावरही त्यांनी प्रकाश टाकला. तसेच, सौ. दीपाली काटे यांनी गुरुजींच्या महिलांविषयी केलेल्या प्रयोगांवर विवेचन केले आणि या पुस्तकामुळे वाचकांना दिव्यत्वाची अनुभूती मिळते, असे मत व्यक्त केले.प्राध्यापिका आकांक्षा सोनवणे यांनी वासुदेवायन हे नवचैतन्य निर्माण करणारे प्रेरणादायी पुस्तक असल्याचे सांगितले. गुरुजींचे शिष्य डॉ.महेश पिंगळे यांनी खंदारे गुरुजींना मी पाहिलेला परमहंस असे संबोधून त्यांच्या कार्याचा गौरव केला.या कार्यक्रमात वासुदेवायन पुस्तकाच्या मुखपृष्ठ डिझाईन करणारे डॉ.प्रकाश कोंका यांचा सत्कार लेखक प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांच्या हस्ते करण्यात आला उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या उत्कृष्ट कलाकृतीची प्रशंसा केली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे तसेच बीड येथील डॉ.पिंगळे मॅडम, वर्षाराणी खंदारे, दीपा काटे, शर्माताई तसेच कनिष्ठ विभागाचे मराठी विषयाचे प्रा.राजाभाऊ नागरगोजे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ.महादेव जगताप यांनी केले, सूत्रसंचलन डॉ.राजीव काळे यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन प्रा.नितीन चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमासाठी गुरुवर्य खंदारे गुरुजींच्या अनेक शिष्यांची उपस्थिती लाभली.



## सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत सामील व्हा : सोनवणे

माजलगाव । प्रतिनिधी
राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मसाजोग ते बीड सदभावना पदयात्राचे काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील काँग्रेस ॲकशन मोडवर आली असून, खासदार सौ. रजनी पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा असून सदरील सदभावना पदयात्रा यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनी पाटील यांच्या सुचनेवरून काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील सक्रिय झाले असून, शहरातील काँग्रेस भवन येथे तालुकाध्यक्ष नारायण होके यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी सदरील बैठकीचे प्रस्ताविक काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केले. सदरील कार्यक्रमात काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी जिल्ह्यातील गेल्या तीन चार महिन्यातील गुन्हेगारीची पार्शश्वभूमी वर मुद्देसूद भाष्य करत, जिल्ह्यातील असणारी ओळख ही सामाजिक समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी, पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन उपस्थितांना काँग्रेस भवन येथे केले. यावेळी जेष्ठ नेते, प्रवीणकुमार शेफ, प्रताप मोरे, ॲड. इनामदार, महावीर मस्के, शेख अहेमद,नाथाभाऊ घडसे, यांची प्रमुख उपस्तीथी होती. तसेच,हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,बळीराम कारके, नेहाल इनामदार, अक्षय थोरात, विनोद सुर्वे, विष्णू चाटे, श्रीनिवास शेळके, प्रकाश क्षीरसागर सह काँग्रेस कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले.यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवसागर शेलूकर यांनी केले.



## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी महामहीम राष्ट्रपती यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी
महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बोधगया हे बौद्धांचे पवित्र स्थान आहे. हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात मिळावे म्हणून, येथे मोठ्या संख्येने उपोषण करणारे पुज्य भंते गन आणि बौद्ध उपासक-उपासिका यांना पाठिंबा म्हणून दि.२८/०२/२०२५ रोजी पुज्य भंते आचलानंदजी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच यु.एस वाघमारे, पी.व्ही बनसोडे, अशोक ठोकळ यांच्या प्रमुख उपस्थितीत महाबोधी महाविहार साठीचा बुद्धगया मंदिर अधिनियम १९४९ रद्द करून सदर बुद्धविहार बौद्धाच्या ताब्यात व्यवस्थापन देण्यात यावे याची आग्रही न्याय मागणीसाठी जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत बीड शहरातील बुद्ध विहार परिसरातील ७६४ उपासक-उपासिका तसेच सामाजिक संघटना आंबेडकर अनुयायी यांच्या सह्यांचे निवेदन भारताचे महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री मुख्यमंत्री बिहार राज्य मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले.

## विशाखा भिल्लारे- वरपे उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी
मराठी समाजशास्त्र परिषद आणि श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी, तालुका महाबळेश्वर जिल्हा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ व्या राष्ट्रीय अधिवेशन दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी 'लिंगभाव, शिक्षक आणि विकास' या मुख्य विषया अंतर्गत आयोजित करण्यात आले होते. या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र आणि महाराष्ट्रबाहेरील १९३ शोध निबंध सादर व प्रकाशित झाले. या शोधनिबंधातून संशोधकांसाठी भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. जी. एस.घुर्ये यांच्या नावाने दिला जाणारा उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार बलभीम महाविद्यालयातील संशोधक व सहाय्यक प्राध्यापक विशाखा विलास भिलारे (वरपे) यांनी महिला प्रश्नावर व महिला सरपंचांच्या विषयावर संशोधन करून 'महिला सरपंच म्हणून अधिकार वापरताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास :बीड तालुक्याच्या महिला सरपंचाच्या संदर्भात समाजशास्त्रीय अभ्यास, या शोधनिबंधनाला मिळाला. हा पुरस्कार देताना शोधनिबंध लेखन आणि सादरीकरण या बाबी लक्षात घेऊन संशोधन निवड समितीने मराठी समाजशास्त्र परिषदेला या निबंधाची शिफारस केली होती.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रो. लक्ष्मणसिंग साळोक, सचिव प्रो. कालिदास भांगे, कोषाध्यक्ष प्रो. प्रियदर्शन भवरे, श्रीमती मीनलबेन मेहता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सतीश देसाई, डॉ. पद्माकर सहारे तसेच मराठी समाजशास्त्र परिषदेची कार्यकारणी सदस्य डॉ.दिगंबर तंगलवाड, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ प्रयागराज, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदान करताना या शोधनिबंधाचे महत्त्व आणि उपयोजिता याविषयी मराठी समाजशास्त्र परिषद आणि महाविद्यालयाने व्यक्त केली.

या त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे, उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. गोविंद बावस्कर, कला व वाणिज्य महाविद्यालय चौसाळाचे प्राचार्य डॉ. विलास भिलारे, डॉ. दत्ता तंगलवाड आदींनी अभिनंदन केले व पुढच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## शासकीय अध्यापक विद्यालय नेकनुर येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा




नेकनूर । प्रतिनिधी
राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानानाकडे आकर्षित करने भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. या प्रसंगी शासकीय अध्यापक विद्यालय नेकनूर येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी डी.एल.एड द्वितीय वर्षातील अध्यापकांनी विज्ञान मंडळ स्थापन करून जि.प.कें.प्रा.शाळा विठ्ठलपेठ नेकनूर व जि.प.कें.प्रा.कन्या शाळा नेकनूर तसेच जि.प.माध्यमिक शाळा नेकनूर मधील शिक्षक व विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शनातील विविध प्रयोगाव्दारे आपल्या ज्ञानात भर टाकल्याचे दिसून आले.लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलम प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे, सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अब्दुल नजीब सर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित श्रीम.नलावडे मॅडम या कार्यक्रमाचे मार्गदर्शक श्री.पुजारी सर व श्री.धोंडगे सर तसेच सांस्कृत विभाग प्रमुख श्री.पट्टेवाड सर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात श्रीनिवास चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून केली. यानंतर विज्ञान मंडळाच्या कार्यकारिणीचे अनावरण करण्यात आले.तसेच विज्ञान मंडळाचे अध्यक्ष नागरगोजे दिपाली, उपाध्यक्ष रोहन बोराडे, सचिव प्रज्ञा काळे, उपसचिव सुहानी पायाळ,कौशअध्यक्ष शेख महेक ,उपकौशअध्यक्ष वंजारे दिक्षांत, बातमीदार अरुण वाळेकर, प्रसिद्धकार तांगडे आरती, छायाचित्रकार चादर ओंकार, आणि विज्ञान मंडळ मार्गदर्शक श्री.एस.आर.धोंडगे सर कार्यकारिणी जाहीर करून विज्ञान विषयाची सर्जनशीलता, निट नेटकेपणा सादरीकरण विज्ञानाची उपयुक्ता व नाविन्यता या पाच निकषांच्या आधारे स्पर्धेचे आयोजन केले होते.

सहभागी विद्यार्थ्यांना विज्ञानाचे विविध प्रयोगांच्या माध्यमातून स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेचा निकाल परिक्षक कु.मोहिनी करांडे, तांगडे क्रांती, सायली सूर्वे, सुमंत खिंडकर यांच्या मार्फत जाहीर करण्यात आला. त्याच्यामध्ये प्रथम क्रमांक सभा पठाण, द्वितीय क्रमांक शेख सदफ, तृतीय क्रमांक सर्वज्ञ दिक्षा या, विद्यार्थ्यांनीने पटकावला आहे.स्पर्धेचे बक्षीस वितरण विज्ञान मंडळाच्या सदस्यांनमार्फत करण्यात आले.यानंतर अध्यक्षांनी त्यांचे मार्गदर्शन व्यक्त केले.व शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या लढ्यास मनसेचे समर्थन



बीड । प्रतिनिधी
ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी सुरू केलेल्या लढ्यास मनसे ने समर्थन दिले असून लढा देणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांचा हृदयी सत्कार करण्यात आला. या सत्काराला काही अपरिहार्य कारणास्तव ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांना उपस्थित राहता आले नाही.

बीड शहराची ओळख असलेले ऐतिहासिक कारंजा टॉवर परिपूर्ण नूतनीकरणासाठी गेल्या १० वर्षांपासून प्रतीक्षेत आहे. मात्र शासन-प्रशासनाच्या उदासीनतेमुळे याकडे गेल्या १० वर्षात ही गांभीर्याने पाहिले गेले नाही. यामुळे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक या सर्व अधिकाऱ्यांना कारंजा टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण करण्यात यावे म्हणून निवेदन देण्यात आले आहे. याला आता १५ दिवसांचा कालावधी उलटला असून सुद्धा अजूनही प्रशासनिक स्तरावर दखल घेण्यात न आल्याने जोपर्यंत ऐतिहासिक कारंजा टॉवर ची दुर्दशा दूर केली जात नाही, नूतनीकरण परिपूर्ण केले जात नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील असा प्रण एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांनी केला आहे. याची दखल महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) चे बीड जिल्हा उपाध्यक्ष सदाशिवराव बिडवे आणि बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी घेऊन एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांचा सत्कार कारंजा टॉवर समोर आयोजित केला होता. काही अपरिहार्य कारणास्तव रमेशराव गंगाधरे सत्काराला उपस्थित राहू शकले नाही. सत्कार प्रसंगी बोलताना सदाशिवराव बिडवे आणि अमरजान पठाण यांनी म्हटले की, कारंजा टॉवर ही फक्त बीड शहराचीच नाही तर जिल्ह्याची ऐतिहासिक ओळख आहे. याला वाचविण्यासाठी प्रयत्न करणारे युसूफ भाई आणि रमेश मामा यांच्यासोबत मनसे सदैव तयार आहे. युसूफ यांनी म्हटले की, निवेदन दिल्यानंतर कारंजा परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसह तरुणांमध्ये कारंजा टॉवर विषयी मोठ्या प्रमाणात जागरूकता आली आहे. येथील नागरिकही कारंजा टॉवर साठी आपापल्या स्तरावर कार्य करीत आहेत. जेव्हा जनता एकत्र येते तेव्हा चांगली फलनिष्पत्ती होते. यावेळी सय्यद शराफत, हरिभाऊ अपसिंगेकर, शेख सईद, शेख रियाज, अन्वर बागवान, फेरोज खान आदींची उपस्थिती होती.

## किरण जावळे यांना ऊस संदेश कृषी राज्यस्तरीय पत्रकार पुरस्कार प्रदान

आष्टी । प्रतिनिधी
पत्रकार क्षेत्रात बातम्याच्या माध्यमातून शेतकर्याच्या हिताच्या व अडिअडचणीच्या काळात शेतकर्याचे प्रश्न शासन दरबारी पाठवण्याचे काम दैनिकच्या माध्यमातून शेतकर्याना न्याय देण्याचे काम पत्रकार क्षेत्रातुन केले आहे. बारावी ऊस परिषद आणि बारावा ऊस भूषण कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळा, त्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना अतुलनाना माने पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, आपण म्हणता ते अगदी बरोबर आहे अश्या विभागवार समित्या बनविणे जरुरी आहे पण त्यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करणे जरुरी आहे आता या चालू हंगामाचे उदाहरण म्हणून पहा राज्यात काही कारखाने अनुक्रमे ७० दिवस ,काही ८० दिवस, काही ९० दिवस चालतील आणि सगळ्यांना एकच प्रश्न पडला की ऊस पिका खालील क्षेत्र कमी झाले याला अनेक कारणे आहेत जसे की पाऊस प्रमाण कमी झाले, अती वृष्टी झाली, कोल्हापूर भागात पूर आला एक ना अनेक अशी कारणे आहेत, कारखाना कार्यक्षेत्रात ऊस कमी आहे, ऊस विकास विभाग वेगळा नाही, अनेक वर्षात बेणे बदल झाला नाही,पायाभूत बेणे विकसित मळे विकसित झाले नाही. उच्च साखर उतारा देणाऱ्या आणि चांगले एकरी उत्पादन देणाऱ्या ऊस जातीचा प्रसार आणि प्रचार झाला नाही. शेतीत आधुनिक तंत्राचा वापर कमी. अती पाण्याचा वापर. जमिनीचा सामू या बदल आणि जमिनीची उत्पादन क्षमता कमी झाली, रासायनिक खतांचे प्रमाण जमीन न तपासता अतिरेकी वापर, मायक्रो न्यूट्रियंट यांचा आणि संतुलित खताचा वापर नाही , कारखाना कार्यक्षेत्रात कृषी मेळावे, ग्राम सभा ऑफ सीझन मध्ये घेण्यात येत नाहीत, कारखाना कार्यक्षेत्रात ये आई चा वापर नाही , ऊस नोंदी आणि ऊस तोडणी ही काही कारखान्यात कम्प्युटरवर झाली आहे ,पण ज्यावेळी कार्यक्षेत्र सोडून ऊस गाळपासाठी आणला जातो त्यावेळी ऊस नोंद आणि तोडणी वेळेवर होत असते, या सारखी अनेक कारणे आहेत मित्रानो ,पण त्यात एक महत्वाची गोष्ट अशी की राज्यातील अनेक कारखान्यांनी अमर्याद प्रमाणात गाळप क्षमता वाढविली आहे त्या प्रमाणात ऊस पिकाखालील क्षेत्र वाढले नाही आणि त्यासाठी राज्यातील काही कारखाने वगळता काही कारखान्यांनी ऊस विकास योजना राबविल्या नाहीत त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्याचे दर एकरी उत्पादन वाढले नाही परंतु त्यांचा दर एकरी उत्पादन खर्च वाढला पर्यायाने तो ऊस उत्पादक शेतकरी ऊस लागवडी पासून खूप लांब गेला यासाठी सक्षम ऊस विकास विभाग कारखान्यांनी केला पाहिजे त्यासाठी चांगले पगार ऊस विकास अधिकारी यांना दिले पाहिजेत, चांगले कृषी ओव्हरशर घेतले पाहिजेत आणि त्यासाठी कारखान्याच्या पदाधिकारी यांनी शेती विभागाकडे इंजिनीयरिंग / रसायन विभागासारखे चांगले पगार दिले पाहिजेत आणि ऊस विभागाने सुद्धा अतिशय जाणीवपूर्वक ऊस विकासाचे म्हणजेच कारखाना कार्यक्षेत्रात कारखान्याचे गाळप शमते इतका आणि चांगल्या साखर उताऱ्याचा ऊस कारखान्याला पुरविला पाहिजे.



कारखान्याची गाळप क्षमता १ वर्षात वाढली जाऊ शकते पण कारखाना कार्यक्षेत्रात ऊस लागवड वाढविण्यासाठी आपणास २ वर्ष लागतात आणि तेही पाऊसमान चांगले झाले तर अन्यथा गाळप कमी होऊन परत कारखान्याचे अर्थ कारण कोलमडून जाते यात शंका नाही म्हणून शेती खाते हे साखर करण्यात खूप महत्त्वाचे खाते आहे याचा विचार जाणीवपूर्वक होणे जरुरी आहे.

पेठ येथील शिराळा रोडवरील जनाई गार्डन ता.वाळवा जि.सांगली येथे दिनांक२८/०२/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता अतुलनाना माने पाटील महाराष्ट्र उत्पादक संघ संस्थापक अध्यक्ष, शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ दादा पाटील यांच्या हस्ते आणि केळी उत्पादक संघाचे प्रदेशाध्यक्ष किरणभाऊ चव्हाण याच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी मा.रघुनाथ दादा पाटील, किरणभाऊ चव्हाण, विवेक कुंभार जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नामदेव परीट कृषी उपसंचालक, कृषी अधिकारी संजय पाटील वाळवा, ऊस तज्ञ सुरेश उबाळे जैन इरिगेशनचे शामकांत पाटील, महेद्र धाडगे, अनंत निकम, सचिन पाटील, आशिष पाटील यांच्या उपस्थित हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

# गोदावरी कोरडी ठक्क भाविकांचे पाण्यासाठी हाल

## ■ पाणी सोडण्याची मागणी ■ राक्षसभुवन, पांचाळेश्वर, सुरळेगावसह अनेक गावाचा पाणी प्रश्न बनला बिकट ■ आ. विजयसिंह पंडित यांनी याकडे विशेष लक्ष घालावे

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील श्री क्षेत्र राक्षसभुवन श्री क्षेत्र पंचाळेश्वर श्री क्षेत्र सुरळेगाव हे तिन्ही गाव गोदावरी नदीवर असून येथे अनेक भाविक दर्शनासाठी येतात परंतु गोदावरी पूर्णता आटल्याने पाण्यासाठी भाविकांचे हाल होत आहे. या गोदावरी पाणी सोडण्याची भाविकासह शेतकऱ्याची मागणी होत असून या पाणी प्रश्नाकडे आमदार विजयसिंह पंडित यांनी या तीर्थक्षेत्र गावाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडावा अशी मागणी भाविक व शेतकऱ्याकडून होत आहे.



गेवराई तालुक्यातील श्रीक्षेत्र राक्षसभुवन हे शनि महाराजांमुळे सबंध भारतामध्ये प्रसिद्ध असून येथे दररोज राज्यावर राज्य बाहेर भाविक दर्शनासाठी येतात तर काही भाविक दशक्रिया विधीसाठी मोठ्या प्रमाणात भाविक येत असून आल्यानंतर अंघोळीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी मोठे हाल भाविकांना सहन करावा लागत आहे यामुळे गोदावरी पाणी सोडण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे तसेच श्री क्षेत्र पंचाळेश्वर व श्री क्षेत्र सुरळेगाव येथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात परंतु गोदावरी पूर्णपणे कोरडी ठक्कर झाल्याने भाविकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत या भाविकांची व शेतकऱ्यांची पाण्यासाठी सोडण्याची मागणी होत आहे तरी आमदार विजयसिंह पंडित यांनी या तीर्थक्षेत्राचे कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडावा अशी मागणी होत आहे.



### भाविकांचे पाण्यासाठी हाल पाणी सोडण्याची मागणी

**श्री क्षेत्र राक्षसभुवन, पांचाळेश्वर, सुरळेगाव हे तिन्ही तिर्थक्षेत्र म्हणून भारतात प्रसिद्ध असून येथे अनेक भावी दर्शनासाठी येतात परंतु गोदावरी नदी पूर्णपणे कोरडी ठक्क झाल्याने भाविकांची पिण्याच्या पाण्यासाठी हाल सहन करावा लागत आहे.**

### तोंडी घास आल्याला पिके पाण्याविना सुकून चालला

गोदा पट्ट्यातील शेतकऱ्यांच्या नदीवर मोठ्या प्रमाणात पाणी स्रोत असून या नदीवर मोठ्या प्रमाणावर सिंचन आहे आत्तापर्यंत पाणी प्रमाणात असल्याने गहू हरभरा ऊस अनेक पिके जोमात आले होते परंतु गोदावरी नदीतील पाणी आटल्याने शेतकऱ्यांचे जोमात आलेले पिके सुकू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण झाले आहे.



# महापशूधन हेल्पलाईन सेंटरचेही केले उद्घाटन

## पुण्यात ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत कायदेतज्ज्ञांचे चर्चासत्र

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पुण्यात पशुसंवर्धन विभागा अंतर्गत गोवंश रक्षण आणि संवर्धन कायद्याबाबत एक दिवसीय चर्चासत्र पार पडले. कायद्यात करण्यात येणाऱ्या सुधारणांविषयी त्यांनी कायदेतज्ज्ञ आणि अधिवक्त्यांशी यावेळी संवाद साधला.

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गोवशांचे रक्षण आणि संवर्धन कायदा संदर्भात राज्यातील प्रमुख कायदेतज्ज्ञ अधिवक्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत औंध येथे एक दिवसीय चर्चा सत्र पार पडले. राज्यातील गोवंशाचे रक्षण आणि संवर्धनाबाबत माहिती जाणून घेत ना. पंकजाताईंनी याबाबतचे कायदे व त्यात करण्यात येणाऱ्या नवीन सुधारणा याबद्दल कायदे तज्ज्ञांच्या सोबत संवाद साधला. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अंबादास जोशी, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, विश्वाहिंदू परिषदेचे कृष्णकांतजी कुदळे तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मुख्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली.

### हेल्पलाईन सेंटरचे उद्धाटन

पशुवैद्यकीय विभागाने शेतकऱ्यांना घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या हेल्पलाईन सेंटरचे उद्धाटन ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.१९६२ महापशुधन संजीवनी या हेल्पलाईन मुळे शेतकरी बांधवांना आपल्या पशुधनांसाठी घरपोच वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय हॉस्पीटल आणि बायो सेक्युरीटी आयव्हीबीपी लॅबला त्यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

## कालवा फुटल्याने शेतपिकांचे नुकसान झालेले असताना भरपाई देण्याऐवजी गुन्हे दाखल केले

# पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांची दादागिरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभारामुळे मसेवाडी लघु सिंचन तलावाचा कालवा अंजनवती शिवारात फुटल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असुन नुकसान भरपाईची मागणी करणा-या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याऐवजी त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रकार बीड तालुक्यातील अंजनवती गावात घडला असुन यामुळे शेतकऱ्यांमध्ये तिव्र संतापाची भावना असुन संबंधित प्रकरणात जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांना प्रत्यक्ष भेटून पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारबाबत निवेदन देऊन झालेल्या अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरण्याचा इशारा शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील आणि सरपंच कैलास येडे यांनी दिला आहे.



### पाटबंधारे विभागाची तक्रार केली म्हणून सुडबुद्धीने खोटा गुन्हा दाखल :- कैलास येडे

मसेवाडी तलावातुन जास्तीचे पाणी सोडल्याने कालवा फुटुन माझ्या सिमला मिरचीचे नुकसान झाले असुन नुकसान भरपाई देण्यात यावी अशी तक्रार दि.८ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग बीड, जा.पा.वि.

पान २ वर

# बीड विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक पक्ष सदस्य नोंदणी करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य नोंदणी सुरू

बीड । प्रतिनिधी

अजितदादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकत्व असून आता जिल्ह्याचा कायापालट होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन देखील मजबूत केले जात आहे. जिल्ह्यात बीड विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.१) करण्यात आली. याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य अविरत सुरू आहे. बीड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाचे निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागले. पराभव मान्य करून आपण कामाला लागलो. अजितदादा पवार हे कार्यक्षम नेतृत्व आहेते. त्यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन मजबूत होत आहे. जातपात, धर्मभेदाला त्यांच्याकडे थारा नाही. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अजितदादा कटिबद्ध असतात. पालकमंत्री पद त्यांच्याकडे असल्याने जिल्ह्याचा विकास आता कुणीही थांबवू शकत नाही. जिल्ह्यात चांगले अधिकारी येतील. अजितदादांकडून बीडसाठी विशेष अधिकारी दिला जाणार आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक पक्ष सदस्य नोंदणी करू, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन करून प्रा.पांडुरंग सुतार यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, महिला-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संतप्त महिलांनी काढला पाण्यासाठी हंडामोर्चा

## दिल्ली मुंबई कलकत्ता, ग्रामसेवक बेपत्ता या जयघोषणांनी तलवाडा ग्रामपंचायत दणाणली!

गेवराई । प्रतिनिधी

उन्हाळा सुरू होताच तलवाडा करांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून १५ ते २० दिवसाला येणारे पाणी महिना महिना येत नसल्याने महिला आणि नागरिक चांगले संतापले आणि पाणीटंचाईमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी दि.०१ मार्च रोजी हंडा मोर्चा काढून ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले. दिल्ली, मुंबई, कलकत्ता, ग्रामसेवक बेपत्ता! कश्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. गेल्या काही महिन्यापासून गावात पाणीपुरवठा विस्कळीत असून, १५ ते २० दिवसांनी येणारे पाणी आता महिनाभर येत नाही. त्यामुळे संतप्त महिलांनी याआधीही २२ फेब्रुवारी रोजी ठिय्या आंदोलन केले होते. त्यावेळी दोन-तीन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करू



अशी ग्वाही ग्रामपंचायतीने दिली होती. मात्र परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने अखेर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. यासंदर्भात पंचायत समिती कार्यालयातही निवेदन देण्यात आले होते. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांना पुन्हा दि.०१ मार्च रोजी होंडा मोर्चा काढावा लागला. महिलांनी डोक्यावर रिकामे हंडे डोक्यावर घेऊन ठिय्या आंदोलन केले. ग्रामसेवक आंदोलनाच्या वेळी अनुपस्थित असल्याने नागरिक अधिकच आक्रमक झाले. यावर प्रतिक्रिया देताना सरपंच सौ. मीना हाते यांनी लवकरच पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच गावाच्या पाणी प्रश्नावर मदत करणारे सुनिता गिल भाभी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेची उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर, शिंगणे जयदेव आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे ग्रामस्थांनी स्वागत केले. ग्रामपंचायतने तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन छेडलेत आहे असा इशारा महिलांनी व गावकऱ्यांनी दिला आहे.

# विषमतावादी व्यवस्था उलथून टाकण्यासाठीच आझाद क्रांती सेनेचा लढा : घोडे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे आझाद क्रांती सेनेचा केडर कॅम्प घेण्यात आला. या वेळी छत्रपती संभाजी महाराज चौक येथून भव्य मोटारसायकल रॅली काढून हॉटेल व्यंकटेश येथे असख्य यूवकांचा केडर कॅम्प घेण्यात आला. संघटनेचे प्रमूख राजेशजी घोडे यांच्या नेतृत्वखाली असंख्य यूवकांनी प्रवेश घेतला. तसेच या केडर कॅम्प मध्ये विविध मागण्यावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.




ज्या प्रस्तापीत राजवटीला हादरा देण्याचे काम सर्व सामान्य आझाद सैनिकाला करावयाचे असून भारत देशातील विषमतावादी व्यवस्था उलथवून टाकण्याचे अवाहन राजेश घोडे यांनी केले ,या वेळी जेष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी,व संघटनेचे ॲड.संतोष कसबे,अशोक ढगे,किसन भिसे सर,तूकाराम शिंदे यांनी ही केडरला मार्गदर्शन केले,तसेच संघटनैचे प्रमूख राजेश घोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वडवणीचे यूवा नेते विलासरावजी कारके, यूवा नेते रतन मूजमूले व माजलगावचे गोपाळ गवळी व असंख्य यूवकांनी संघटनेत प्रवेश केला. या कार्यक्रमाला वडवणीचे महादेव अवाड,सतिष हनवते, अरुण अवाड,लक्ष्मण अवाड,धारूरचे बळीराम मस्के, मंगेशजी शिंदे, आसेफजी पटेल दशरथ कूचेकर यांची उपस्थिती होती.

तसेच या कार्यक्रमास विविध गावचे पदाधिकारी कैलास गायकवाड ,आकाश हतागळे,माजी सरपंच अर्जून ढगे,सौरव कांबळे,राजू बडवणे,संतोष कारके,हे अवर्जूनया केडर कॅम्पला हजर होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहूल गायकवाड,संदिप भिसे यांनी अथक परिश्रम केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT